ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १ मे, १९५७ | अंक १८

## विविध माहिती

**गाड्या जुळविण्याची सोय**—दिल्लीपासून १० मैलांवर तघलखाबाद येथें रेल्वेच्या गाड्या जुळविण्याची सोय करण्यांत येणार आहे. सध्यां मालगाड्या जुळविण्यासाठी व मालाची चढउतार करण्यासाठी दिल्ली अगर नवी दिल्ली येथील मालधक्यांचा उपयोग करावा लागतो. त्यामुळें गाड्यांची गर्दी होते. नवीन यार्डांसाठी १ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**महारोगावर नवें औषध**—ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंतील इस्पितळांतील महारोग झालेल्या रोग्यांना नवीन औषध देण्यांत येत आहे. ह्या औषधाच्या परिणामकारी गुणाबद्दल इतक्यांतच कांहीं सांगतां येत नाहीं. त्याचा प्रयोग निदान दोन वर्षे तरी करण्यांत आला पाहिजे असें तज्ज्ञांचें मत आहे.

**अणुबाँबनें होणारी हानि**—' हिरोशिमाची छाया ' ह्या नांवाचा एक चित्रपट लंडनमधील वृत्तपत्रकारांना दाखविण्यांत आला. हिरोशिमा ह्या जपानमधील शहरावर टाकण्यांत आलेल्या बाँबमुळें जी हानि झाली तिचें चित्रण ह्या चित्रपटांत करण्यांत आलें आहे. मूळच्या जपानी चित्रपटाचीच ती एक आवृत्ति आहे.

**ठाणें येथें खुलें नाट्यगृह**—भारताच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाची सांवत्सरी साजरी करण्यासाठी ठाण्याच्या नागरिकांनीं एक कमिटी स्थापन केली आहे. स्वातंत्र्ययुद्धाचें स्मारक म्हणून ठाणें येथें ६०,००० रुपये खर्चून एक खुलें नाट्यगृह बांधण्यांत येणार आहे.

**ओरिसामधील हिंवतापविरोधी मोहीम**—ओरिसाच्या सरकारनें राष्ट्रीय मलेरियाप्रतिबंधक योजनेप्रमाणें मोहीम चालू केली होती. ह्या राज्यांत दरसाल सुमारें ५०,००० माणसें ह्या रोगानें दगावत असत. सरकारनें सार्वजनिक आरोग्यविषयक बऱ्याच योजना अमलांत आणल्या असल्या तरी डॉक्टरांची टंचाई फार भासत आहे.

**रशिआ-इराण व्यापारी करार**—रशिआ व इराण ह्या देशांनीं १९५७ ते १९६० ह्या मुदतीपुरता एक व्यापारी करार केला आहे. इराण रशिआला कांहीं खनिजें, तांदूळ, सुकीं फळें, कापूस, इत्यादि माल पुरविणार आहे. रशिआ इराणला औद्योगिक व शेतीविषयक यंत्रसामुग्री पुरविणार आहे.

**गुजरातमधील साखरकारखाना**—गुजरातमधील पहिला सहकारी साखरकारखाना बारडोली येथें नुकताच सुरू झाला. कारखान्याला १ कोटी रुपयांचें भांडवल लागलें. त्यापैकी बहुतेक भांडवल शेतकऱ्यांनीं जमा केलें आहे. कारखाना रोज ८०० टन ऊंस गाळूं शकेल. कारखान्याच्या शेतीवर यंदा १,२०० एकर ऊंस लावण्यांत आला आहे.

**अफूच्या विक्रीला बंदी**—उत्तर प्रदेश सरकारनें १९५९ च्या एप्रिलपासून खाण्यासाठी होणाऱ्या अफूच्या विक्रीला पूर्णपणें बंदी करण्याचें ठरविलें आहे. येत्या दोन वर्षांत परवानावाल्या अफू खाणाऱ्यांची अफू हळुहळू तोडण्यांत येणार आहे. अफू तोडल्यामुळें ज्यांची प्रकृति बिघडेल त्यांच्यासाठी इस्पितळाची सोय करण्यांत आली आहे.

**आशियामधील सिमेंटचें उत्पादन**—आशिया व अति पूर्वेंतील ११ देशांतील सिमेंटचें उत्पादन वाढलें आहे. १९५२ सालीं ह्या देशांनीं १ कोटी, ५३ लाख टन सिमेंटचें उत्पादन केलें. १९५५ सालीं २ कोटी, २१ लाख टन सिमेंट उत्पादन करण्यांत आलें आणि १९५६ सालीं २ कोटी, ६१ लाख टन सिमेंट निर्माण करण्यांत आलें. ह्या ११ देशांत भारत एक आहे.

**नफेखोरांना जागच्या जागीं शिक्षा**—कराचीमधील तीन महत्त्वाच्या बाजाराच्या ठिकाणीं मॅजिस्ट्रेटसचीं कोर्टें उघडण्यांत आलीं आहेत. ज्या वस्तूंचे भाव नियंत्रित केलेले असतील त्यांच्या अधिक किंमती व्यापाऱ्यांकडून घेण्यांत आल्यास त्यांना तावडतोब सजा देण्यासाठीं सरकारनें ही व्यवस्था केली आहे.

**भारतामधील रेल्वे**—भारत सरकारच्या रेल्वेखात्यानें १९५५-५६ सालांतील रेल्वेच्या कामकाजाविषयीं सुलभ माहिती देणारें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकांत कांहीं उपयुक्त परिशिष्टेंहि देण्यांत आलीं आहेत. १९३८-३९ पासून पुढील सालांतील रेल्वेविषयक आंकडेवार माहितीहि देण्यांत आली आहे.

**काबूल येथें विमानतळ**—काबूल शहराजवळ विमानतळ बांधण्याचें सरकारनें ठरविलें आहे. अफगाणिस्थानच्या सरकारला ह्या कामासाठी लागणारें सर्व प्रकारचें साहित्य रशिआ उधारीनें देणार आहे. ह्यासंबंधीं नुकताच करार करण्यांत आला आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## अमेरिकेच्या उसनवार चांदीची परतफेड

युद्धकाळांत अमेरिकेनें भारताला २२३ कोटि औंस चांदी उसनी दिली होती. ह्या देण्याचा पाकिस्तानचा हिस्सा ५३ कोटि औंस चांदीचा असून, भारतावर १७ कोटि औंस चांदी परत करण्याची जबाबदारी होती. भारतावरील जबाबदारी पार पाडण्याचे बाबतींत खालीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली आहे.

५ कोटि औंस वजनाचें पाटलें भारत ताबडतोब अमेरिकेकडे पाठवील. त्यापैकी ३० लक्ष औंस चांदी २४ एप्रिल रोजीं एस्. एस्. प्रेसिडेंट टेलर ह्या बोटीनें अमेरिकेच्या प्रवासास निघाली. उरलेल्या १२ कोटि औंस चांदीच्या पोटीं, भारत सरकार आपल्या जवळील चांदीच्या पावल्या देईल. हीं नाणीं नेऊन त्यांतील चांदीचा अंश वितळवून घेण्याची जबाबदारी अमेरिकन सरकारनें घेतली आहे.

### अमेरिकेनें चांदी उसनी का दिली ?

अमेरिकन चांदी भारतांत युद्धकाळीं कां आणण्यांत आली, ह्याचें विवेचन येथें करणें उद्बोधक होईल. युद्धकाळांत सोनें व चांदी ह्यांची किंमत कमालीची वाढली, तेव्हां सोन्याप्रमाणें चांदीचीहि आयात करतां येऊन ती येथें विकतां आली, तर ह्या धातूचा पुरवठा वाढून त्याची किंमत मर्यादित होऊं शकेल, असें भारत सरकारनें ठरविलें. चांदीचा मोठा साठा अमेरिकेंत होता आणि त्यांतूनच चांदीची आयात करणें शक्य होतें. पहिल्या महायुद्धांत चांदीचा तुटवडा पडून नवीन रुपये पाडणें आणि त्यांचा पुरवठा करणें कठीण झालें होतें, तेव्हांहि ह्या कठीण परिस्थितीस तोंड देण्यासाठी सरकारनें अमेरिकेकडून चांदी घेतली होती. "भारत सरकारच्या चलनपुरवठ्यास साहाय्य केलें म्हणजे ह्या देशाचें युद्धकार्य सुकर होईल, म्हणून अमेरिका येथील सरकारास उसनी चांदी देत आहे." असें अमेरिकन तिजोरीचे चिटणीस, मि. मॉर्गेन थॉ, ह्यांनीं जाहीर केलें होतें. युद्धसमाप्तीनंतर चांदी परत करावयाची होती, ती आतां करण्यास प्रारंभ होत आहे.

---

**पाकिस्ताननें मुदत मागितली**—भारताची फाळणी होण्यापूर्वी अमेरिकेनें भारताला चांदी कर्जाऊ दिली होती. कर्जाऊ घेतलेल्या चांदीचा आपला वांटा परत करण्यासाठी पाकिस्तानच्या सरकारनें ५ वर्षांच्या मुदतीची मागणी केली आहे. पाकिस्ताननें अमेरिकेला ५.३ कोटि औंस चांदी परत करावयाची आहे. भारत सरकारनें मात्र आपल्या वांट्याची कर्जाऊ चांदी परत केली आहे.

**मध्यप्रदेशांत कागदाचा कारखाना**—मध्यप्रदेशाच्या रेवा विभागांत रोज १०० टन कागद तयार करूं शकणारा एक कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहे. कागदासाठी लागणाऱ्या बांबूच्या बनाचा ह्या भागांत चांगला पुरवठा आहे. भारतामधील एका प्रमुख कागद तयार करणाऱ्या कंपनीतर्फेच नवा कारखाना काढण्यांत येणार आहे.

**इजिप्तकडून कापसाची आयात**—इजिप्तच्या व्यापारी प्रतिनिधींशीं करण्यांत आलेल्या करारास अनुसरून भारत सरकार इजिप्तकडून लांब धागा निघणाऱ्या कापसाच्या २०,००० गांठी आयात करणार आहे. कराराप्रमाणें भारतामधील मालाला इजिप्तमध्यें खात्रीची बाजारपेठहि उपलब्ध करण्यांत आली आहे.

## एंजिनिअरिंगच्या मालाला बाजारपेठ

भारताच्या सरकारनें एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी एक कौन्सिल स्थापन केलेलें आहे. ह्या कौन्सिलतर्फे पांच जणांचें प्रतिनिधिमंडळ ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, इथिओपिआ, सुदान, इजिप्त व एडन ह्या देशांचा दौरा करून परतलें आहे. प्रतिनिधिमंडळानें आपला अहवाल सादर केला असून तो प्रसिद्धहि करण्यांत आला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, भारतामधील एंजिनिअरिंगच्या धंद्याच्या मालाला वरील देशांतून चांगला वाव आहे. एंजिनिअरिंगच्या कारखान्यांनीं नवीन प्रकारचा माल निर्यात करण्याची जरूर आहे. मध्यपूर्व व पूर्व आफ्रिकेंतील देश अजून मुख्यतः शेतीप्रधान आहेत. तथापि त्यांचें आर्थिक जीवन झपाट्यानें विकास पावत आहे. त्यांच्या गरजा वाढत्या आहेत. म्हणून भारताला आपल्या मालाची निर्यात वाढविण्याला ही वेळ अगदीं योग्य अशी आहे. तथापि सर्वच बाजारपेठांतून स्पर्धा वाढत आहे आणि गिऱ्हाईक अधिक चिकित्सक बनत चाललें आहे. म्हणून भारतामधील कारखानदारांनीं आपल्या मालाचा दर्जा व किंमती ह्या दोन्हीं बाबतींत परदेशांतील स्पर्धकांना तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणें, मालाचा दर्जा एकसारखा आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणांना अनुसरून असला पाहिजे. भारतामधील कारखानदारांनीं आपल्या मालाच्या एजंटांना आपल्या कारखान्यांतून शिक्षण देण्याचीहि व्यवस्था केली पाहिजे. असें केल्यानें मालाच्या गिऱ्हाइकांच्या अडचणी दूर होऊन बाजारपेठेच्या विस्तारासहि मदत होईल.

---

## जनरल इन्शुरन्स ताब्यांत घेणें फायद्याचें नाहीं

इंडिअन इन्शुरन्स कंपनीज असोसिएशनची वार्षिक सभा कलकत्ता येथें भरली होती. अध्यक्षस्थान श्री. डी. दासगुप्ता ह्यांनीं स्वीकारलें होतें. श्री. दासगुप्ता आपल्या भाषणांत म्हणाले कीं विमेदाराच्या हिताचें संरक्षण करण्यासाठी अगर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा उपलब्ध करण्यासाठी जनरल इन्शुरन्सचा धंदा ताब्यांत घेणें सरकारच्या फायद्याचें नाहीं. भांडवलाचा संचय वाढविण्याच्या दृष्टीनें ह्या धंद्यांतून सरकारला फारच थोडा निधी उपलब्ध होऊं शकेल. जनरल इन्शुरन्सच्या धंद्यांत जोखीम मोठी असते. पण त्या मानानें हप्त्याच्या रकमा मात्र थोड्या असतात. हप्त्याच्या उत्पन्नांतून विमा कंपन्यांना पार न पडलेल्या जोखीमांसाठी तरतूद करावयाची असते. त्याशिवाय अनपेक्षित गंडांतरें आलीं तर त्यांना तोंड देण्यासाठीहि निधी राखून ठेवावा लागतो. विम्याचा सर्वसामान्य धंदा करणाऱ्या कंपनीजवळचा पैसा हा कांहीं आयुर्विमा कंपन्यांच्या हातीं असलेल्या पैशाप्रमाणें ट्रस्टचा पैसा नसतो. शिवाय ह्या धंद्यांतील विमापत्रकें अल्प मुदतीचीं असतात. त्या मुदतीनंतर तीं पुन्हां नव्यानें घ्यावीं लागतात. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील विमा कंपन्यांनीं परदेशांत मिळविलेल्या धंद्यांत बरीच वाढ झालेली आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें परदेशांत अधिक शाखा खोलण्यासाठी सुलभतेनें परवाने द्यावे. त्याचप्रमाणें, परदेशांतून आयुर्विम्याचें काम मिळविण्यासाठी भारतामधील विमा कंपन्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत यावें. एजन्सीची पद्धत उपयुक्त असल्यानें ती चालू ठेवणें अगत्याचें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जें

### री-फायनान्स कॉर्पोरेशनची स्थापना : १५ बँकांचें सहकार्य

मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जें पुरविण्यासाठी भारत सरकारनें री-फायनान्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचें ठरविलें आहे. १२½ कोटी रुपयांच्या ऑर्डिनरी भागांच्या भांडवलाची ती पब्लिक लिमिटेड कंपनी होईल. हें भाग भांडवल पुढें वाढवितां येईल. प्रारंभींचें भाग भांडवल खालीलप्रमाणें उभारण्यांत येईल :—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह बँक | ५ कोटी रु. |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २½ कोटी रु. |
| लाइफ इं. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | २½ कोटी रु. |
| इतर बँका | २½ कोटी रु. |

गेल्या ऑगस्ट महिन्यांत भारत सरकार व अमेरिकन सरकार ह्यांच्यामध्यें एक करार झाला. त्या करारानुसार, २६ कोटी रुपयांची (५½ कोटी डॉलर्स) रक्कम चालू बँकांमार्फत उद्योगधंद्यांना कर्जाऊ देण्यासाठी राखून ठेवलेली आहे. म्हणजे री-फायनान्स कॉर्पोरेशनला प्रारंभींच १२½ कोटी + २६ कोटी = ३८½ कोटी रु. उपलब्ध होतील. अर्थात्, २६ कोटी रु. कॉर्पोरेशनला सरकारकडून ३० वर्षांसाठी मिळतील, त्यावर व्याज द्यावें लागेल.

बँका मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना जीं कर्जें देतील, त्यांचे पोटीं बँकांना स्वतःला कॉर्पोरेशनकडून कमी दरानें कर्जें मिळूं शकतील. कर्जाची मुदत ३ ते ५ वर्षें राहील. कोणाहि एका कर्जदाराला ५० लक्ष रुपयांपेक्षा मोठें कर्ज दिलें जाणार नाहीं. कर्जें देणाऱ्या बँका कर्जाबाबत सर्व जबाबदारी घेतील; ह्या कर्जांची छाननी कॉर्पोरेशन साधारणतः करणार नाहीं. ह्या कर्जाचे पोटीं कॉर्पोरेशनकडे डिस्कौंटसाठी मागणी येईल, तेव्हां कर्ज दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं उद्दिष्टें त्यानें साध्य होतात किंवा नाहीं, एवढेंच कॉर्पोरेशन पाहील. कॉर्पोरेशननें बँकांना ५% व्याजाचा दर लावला, तर बँका कर्जदार उद्योगधंद्यांकडून ६½% पर्यंत व्याज घेऊं शकतील. ह्या योजनेंत सामील होणाऱ्या बँकांना त्यांच्याकडील ठेवींच्या प्रमाणांतील प्रतवारीप्रमाणें शेअर्स मिळतील आणि प्रत्येकीला ३८½ कोटी रुपयांच्या रकमेंत वाटा मिळेल. प्रत्येक बँकेला किमान १ कोटी रु. व कमाल ३ कोटी रु. चा वाटा मिळेल. स्टेट बँकेला प्रथमपासूनच ५ कोटी रु. चा वाटा मिळेल. खालील १५ बँका ह्या योजनेंत दाखल होणार आहेत. :—

(१) स्टेट बँक (२) सेंट्रल बँक (३) पंजाब नॅशनल बँक (४) बँक ऑफ इंडिया (५) बँक ऑफ बरोडा (६) नॅशनल बँक* (७) यु. क. बँक (८) लॉइड्स बँक* (९) अलाहाबाद बँक (१०) चार्टर्ड बँक* (११) इंडियन बँक (१२) युनायटेड बँक (१३) मर्कंटाइल बँक* (१४) देना बँक (१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद. (वरीलपैकी * अशी खूण असणाऱ्या बँका विदेशी एक्सचेंज बँका आहेत.)

उद्योगधंद्यांच्या गरजा पुरवणाऱ्या बँकिंगची आपल्याकडे पुरेशी सोय नाहीं, ह्या दृष्टीनें कॉर्पोरेशनच्या स्थापनेचें स्वागत केलें पाहिजे. १९५४ सालीं श्रॉफ कमिटीनें अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता प्रतिपादन केली होती. व्यापारी बँकांचें भांडवल मुख्यतः चालू खात्याच्या ठेवींतून जमा होतें; एका वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या ठेवींची रक्कम त्यांच्या एकूण ठेवींच्या १०% पेक्षां ज्यास्त भरत नाहीं. म्हणून, त्यांना अल्प मुदतीच्या कर्जांपुरतें आपलें क्षेत्र मर्यादित ठेवणें भागच असतें. उद्योगधंद्यांना नया पैसा स्टॉक मार्केटच्या द्वारां आकृष्ट होण्यास सध्यां अनुकूल वातावरण नाहीं; तेव्हां अशा समयीं कॉर्पोरेशनच्या हातून बहुमोल कामगिरी होऊं शकेल.

---

## भारताला परदेशी भांडवलाची जरूरी

इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेची वार्षिक बैठक कलकत्ता येथें भरली होती. संस्थेचे अध्यक्ष श्री. के. पी. गोयंका आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारताच्या औद्योगिक विकासासाठी परदेशांतील भांडवलाची अतिशय गरज आहे. परदेशी भांडवल सार्वजनिक मालकीच्या विभागाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. सरकारी मालकीच्या औद्योगिक संघटनासाठीं सरकार परदेशांकडून कर्जें मिळविण्याच्या वाटाघाटी करतें. पण खाजगी मालकीच्या विभागाच्या दृष्टीनेंहि परदेशी भांडवलाला महत्त्व आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें साध्य करून घेण्यासाठी भारतामधील खाजगी मालकीच्या भांडवलालाहि परदेशी भांडवलाची मदत पाहिजे आहे. बहुतेक देशांचा औद्योगिक विकास परदेशी भांडवलाच्या मदतीनें झालेला आहे, ही गोष्ट पुष्कळदां विसरली जाते. तेव्हां, भारतानें परदेशी भांडवलाची अपेक्षा करणें हें साहाजिक आहे. भारतांत अशा प्रकारची परिस्थिति निर्माण केली गेली पाहिजे कीं जिच्या योगानें परदेशीय भांडवलाला येथें येण्याचें आकर्षण वाटलें पाहिजे. भारताच्या औद्योगीकरणाला मदत करण्याची कांहीं मित्रदेशांना इच्छा आहे. पण भारतामधील परिस्थिति त्यांना उत्साहजनक वाटत नाहीं. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाबाबतच्या सरकारी धोरणाविषयीं परदेशीय भांडवलदारांना बरीच साशंकता वाटत आहे. अशा परिस्थितींत सरकारच्या धोरणाबद्दल अधिक सुस्पष्ट घोषणा करण्यांत आली तर तें फायद्याचें होईल. परदेशी भांडवलाला खुद्द त्याच्याच देशांत व इतरहि कांहीं देशांत वाव मिळण्याची शक्यता आहे, ही गोष्ट भारतानें लक्षांत ठेवली पाहिजे.

---

**अमेरिकेला मिळालेली कर्जफेड**—गेल्या वर्षी अमेरिकेकडून कर्जें घेतलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांनीं ७० कोटी डॉलर्स कर्ज परत केलें. तथापि अमेरिकेला परदेशांकडून अजूनहि ११५० कोटी डॉलर्स परत मिळावयाचे आहेत. परदेशांनीं अमेरिकेचें कर्ज फेडून तें कमी केल्याचें हें तिसरें वर्ष आहे.

# The Bank of

## Balance Sheet as

| 31-12-1955 Rupees | CAPITAL & LIABILITIES | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|---|
| | **1. Capital** | | | |
| | Authorised Capital | | | |
| 50,00,000 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | | 50,00,000 0 0 |
| | Issued and Subscribed Capital | | | |
| 32,00,000 | 64,000 Shares of Rs. 50/-each ... | | | 32,00,000 0 0 |
| | Called and Paid-up Capital | | | |
| | 64,000 Shares of Rs. 50/- each | | | |
| 16,00,000 | Rs. 25/- per share called and paid up ... | | | 16,00,000 0 0 |
| 150 | Calls in Advance ... | | | 150 0 0 |
| | **2. Reserve Fund & Other Reserves** | | | |
| 7,00,000 | *As per last Balance Sheet ... | | 7,75,000 0 0 | |
| 75,000 | Transferred this year | Rs. 1,00,000 0 0 | | |
| | Appropriated from the profit for | | | |
| 7,75,000 | the year ended 31-12-1956 | Rs. 1,25,000 0 0 | 2,25,000 0 0 | 10,00,000 0 0 |
| | *(Includes Rs. 2,52,995/- received as premiums on issue of shares in past years) | | | |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | | |
| 1,53,61,489 | Fixed Deposits ... | | 1,93,55,229 9 3 | |
| 2,08,21,710 | Savings Bank Deposits ... | | 2,52,30,291 11 0 | |
| 1,44,48,278 | Current accounts, Contingency accounts etc. ... | | 1,80,22,674 9 9 | |
| 5,06,31,477 | | | | 6,26,08,195 14 0 |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | | |
| 6,75,000 | (i) In India ... | | 10,00,000 0 0 | |
| nil | (ii) Outside India ... | | nil | 10,00,000 0 0 |
| | Particulars | | | |
| | (i) Secured by part of Bank's Investments ... | | 10,00,000 0 0 | |
| | (ii) Unsecured ... | | nil | |
| 3,25,658 | **5. Bills Payable** ... | | | 9,07,571 3 1 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | | |
| 31,15,198 | (i) Payable in India ... | | 45,56,947 12 11 | |
| nil | (ii) Payable outside India ... | | nil | 45,56,947 12 11 |
| | **7. Other Liabilities** | | | |
| 11,357 | Unpaid Dividend ... | | 13,186 9 11 | |
| 477 | Rebate on Bills Discounted ... | | 432 5 0 | |
| 6,98,191 | Branch Adjustments ... | | 8,09,845 14 4 | |
| 7,10,025 | | | | 8,23,464 13 3 |
| 4,25,995 | **8. Acceptances, Endorsements and other obligations per Contra:** | | | 6,30,570 0 0 |
| 3,60,949 | **9. Profit and Loss:** | | | |
| | Profit as per last Balance Sheet | | | |
| | Less appropriations:— ... | | 3,81,744 1 6 | |
| 75,000 | Reserve Fund | Rs. 1,00,000 0 0 | | |
| 1,70,000 | Provision for Income-tax and Super-tax | Rs. 1,70,000 0 0 | | |
| 80,000 | Dividend | Rs. 80,000 0 0 | | |
| 3,25,000 | | | 3,50,000 0 0 | |
| 35,949 | | | 31,744 1 6 | |
| 3,45,795 | Add profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss account ... | | 4,01,169 6 6 | |
| 3,81,744 | | | 4,32,913 8 0 | |
| | *Less*: | | | |
| | Transferred to Reserve Fund | Rs. 1,25,000 0 0 | | |
| | Provision for Income tax and Super-tax | Rs. 1,80,000 0 0 | 3,05,000 0 0 | 1,27,913 8 0 |
| | Carried Over... | | | 7,32,54,813 3 3 |

# Maharashtra, Limited, Poona

at 31st December, 1956

| 31-12-1955 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 57,75,578 | In hand and with Reserve Bank and State Bank of India (Including Foreign Currency Notes) ... | | 69,79,409 2 4 |
| | **2. Balances with Other Banks** (In current account) | | |
| 3,38,300 | (i) In India ... | 4,69,854 5 9 | |
| nil | (ii) Outside India ... | nil | 4,69,854 5 9 |
| nil | **3. Money at Call and Short Notice** ... | | 35,00,000 0 0 |
| | **4. Investments :** Securities – At or below redemption value. | | |
| 2,33,42,804 | (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these, securities of the face value of Rs. 1,24,56,000/- are with Banks for Over-draft arrangements) (Market value Rs. 2,47,36,104 10 0) (Face value Rs. 2,58,23,400 0 0) ... | 2,51,42,720 13 1 | |
| 4,86,853 | (ii) Shares : At or below cost. Ordinary Shares (fully paid-up) (Market value Rs. 1,26,795-12-0) Rs. 1,22,470 0 3; Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 3,50,189-6-0) Rs. 3,49,348 13 0; Ordinary shares (partly paid-up) (Market value Rs. 18,437-12-0) Rs. 17,683 12 0 | 4,89,502 9 3 | |
| 14,000 | (iii) Debentures or Bonds : At cost (Market value Rs. 68,075-0-0) ... | 67,270 0 0 | |
| nil | (iv) Gold ... | nil | 2,56,99,493 6 4 |
| 2,38,43,657 | | | |
| | **5. Advances** (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors): | | |
| | (1) Loans, Cash-credits, Over-drafts etc. | | |
| 2,31,77,053 | (i) In India Rs. 2,91,55,910 12 9 | | |
| nil | (ii) Outside India ... nil | 2,91,55,910 12 9 | |
| | (2) Bills discounted and purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 1,89,060 | (i) Payable in India Rs. 4,40,220 0 6 | | |
| nil | (ii) Payable outside India nil | 4,40,220 0 6 | 2,95,96,130 13 3 |
| 2,33,66,113 | | | |
| | **Particular of Advances :** | | |
| 1,90,60,128 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 2,45,16,162 15 10 | |
| 7,71,912 | (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 21,92,778 8 5 | |
| 35,34,073 | (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 28,87,189 5 0 | |
| nil | (iv) Debts considered doubtful or bad not provided for ... | nil | |
| | | 2,95,96,130 13 3 | |
| 9,52,011 | (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 7,01,543 8 1 | |
| 14,00,339 | (vi) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as Members ... | 13,61,774 8 6 | |
| 9,52,011 | (vii) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 9,57,418 5 3 | |
| | Carried over ... | | 6,62,44,887 11 8 |

# The Bank of
## Balance Sheet as

| 31-12-1955 Rupees | CAPITAL & LIABILITIES | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 7,32,54,813 3 3 |
| 1,30,750 | **10. Contingent Liabilities** On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 1,30,050 0 0 | |
| | *Note*:—Provision in respect of future gratuity to staff has not been made, the liability for which has not been ascertained. | | |
| 5,86,40,247 | Total ... | | 7,32,54,813 3 3 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st DECEMBER, 1956

| 31-12-1955 Rupees | EXPENDITURE | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 7,87,727 | 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | | 10,14,144 7 3 |
| | 2. Salaries and Allowances and Provident Fund : | | |
| 17,700 | Manager ... | 21,750 0 0 | |
| 6,53,360 | Others ... | 7,54,206 6 10 | 7,75,956 6 10 |
| 10,675 | 3. Directors' and Local Committee Members' fees and allowances ... | | 12,375 0 0 |
| 86,486 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 89,299 4 11 |
| 2,754 | 5. Law Charges ... | | 10,079 9 0 |
| 43,786 | 6. Postage, telegrams, stamps and telephone ... | | 56,514 8 4 |
| 2,500 | 7. Auditors' fees including travelling expenses | | 3,300 0 0 |
| 57,765 | 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property ... | | 59,825 7 4 |
| 1,05,447 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,24,734 11 10 |
| nil | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | nil |
| | 11. Other expenditure : | | |
| 34,805 | Sundry charges ... | 52,408 8 2 | |
| 15,000 | Travelling & Conveyance ... | 27,611 2 9 | 80,019 10 11 |
| 3,45,795 | 12. Balance of profit (subject to taxation) carried to Balance Sheet ... | | 4,01,169 6 6 |
| 21,63,800 | Total ... | | 26,27,418 8 11 |

| 31-12-1955 Rupees | INCOME (Less prvisions made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisions) | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 19,22,628 | 1. Interest and Discount ... | | 23,13,643 12 7 |
| 1,91,928 | 2. Commission, exchange, brokerage ... | | 2,52,295 10 10 |
| 15,787 | 3. Rent (Less taxes and other charges) ... | | 18,871 8 0 |
| nil | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land premises and other assets (not credited to Reserve or any particular fund or account) ... | | nil |
| nil | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land premises and other assets (not credited to Reserve or any particular fund or account) ... | | nil |
| nil | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets ... | | nil |
| | 7. Other receipts : | | |
| 479 | Transfer fees ... | 523 14 0 | |
| 32,978 | Lockers rental ... | 42,083 11 6 | 42,607 9 6 |
| 21,63,800 | Total ... | | 26,27,418 8 11 |

**Report of the Auditors to the Share-holders.** (*See next page*)

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra Limited as of 31st December, 1956 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the returns of 8 branches audited by other Auditors and the unaudited but certified returns from 26 other branches not visited by us.

In accordance with the provisions of section 29 of the Banking Companies Act, 1949 read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of the Companies Act, 1956 the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the sixth Schedule of the Companies Act, 1956. The accounts are therefore drawn up in conformity with forms A & B of the third Schedule to the Banking Companies Act, 1949.

# Maharashtra, Limited, Poona
**at 31st December 1956**

| 31-12-1955 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 6,62,44,887 11 8 |
| 18,17,695 | (viii) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking company are interested as Directors, Partners, or Managing Agents or, in the case of private companies, as Members. | 23,61,518 0 5 | |
| 64,308 | (ix) Due from banking companies —(Secured) ... | 14,225 13 3 | |
| 2,17,852 | (Unsecured) ... | 1,94,002 9 6 | |
| | **6. Bills Receivable, Being Bills For Collection As Per Contra :** | | |
| 31,15,198 | (i) Payable in India ... | 45,56,947 12 11 | |
| nil | (ii) Payable outside India ... | nil | 45,56,947 12 11 |
| 4,25,995 | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra :** ... | | 6,30,570 0 0 |
| | **8. Bank's Premises : Less depreciation.** | | |
| | Cost as at 31-12-1955 ... | 8,33,454 15 3 | |
| | Additions during the year ... | nil | |
| | | 8,33,454 15 3 | |
| 7,85,970 | Less total depreciation to-date ... | 64,484 15 3 | 7,68,970 0 0 |
| | **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault Etc. : Less Depreciation :** | | |
| | Cost as at 31st December, 1955 ... | 5,90,884 13 8 | |
| | Additions during the year ... | 51,929 11 4 | |
| | | 6,42,814 9 0 | |
| 4,53,359 | Less total depreciation to-date | 1,76,706 2 1 | 4,66,108 6 11 |
| | **10. Other Assets Including Silver** | | |
| 2,625 | Stamps on hand ... | 2,519 12 9 | |
| 1,95,938 | Tax paid in advance and at source ... | 2,32,636 6 3 | |
| 1,53,753 | Interest accrued on investments ... | 1,70,664 12 5 | |
| 62,761 | Sundry advances ... | 60,508 4 4 | |
| 1,21,000 | Shares of the Maharashtra Executor & Trustee Co. Private Ltd. (Partly paid-up) ... | 1,21,000 0 0 | |
| 5,36,077 | | | 5,87,329 3 9 |
| nil | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | nil |
| 5,86,40,247 | Total ... | | 7,32,54,813 3 3 |

**Statement pursuant to Section 212 of the Companies Act, 1956 :**

Re :—The Maharashtra Executor & Trustee Company Private Limited, a Subsidiary of this Company.

(a) The Bank held 2420 shares of the nominal value of Rs. 100/- each (Rs. 50/- per share called and paid up) out of 2500 shares issued for subscription as at the close of the Company's financial year ending 31st December 1956. (b) The Company made a profit of Rs. 3,614-10-3 for the year ended 31st December, 1956 and this has not been dealt with in the holding Company's Books. (c) The Company's profits for its previous financial years from 10th April, 1946, the date of its incorporation upto 31st December, 1955 after payment of taxation, amount of Rs. 18,570-10-7. Out of this, amount to the extent of Rs. 17,610-5-0 being dividends for the relevant years has been dealt with in the holding Company's Books, leaving a net aggregate amount of Rs. 367-8-7, not dealt with in the Company's Accounts.

*POONA CITY,*
*22 January, 1957.*

P. V. Agashe, *Accountant* | C. V. Joag, *Manager* | V. P. Varde, *Chairman*

N. G. Pawar, M. V. Shah, M. R. Joshi, M. S. Parkhe, M. B. Jambhekar, D. K. Sathe, B. M. Gupte, F. D. Pudumjee — *Directors*

We report that : (*See previous page*)

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) In our opinion, proper books of Account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the bank; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1956 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona City,
22nd January, 1957

Kulkarni and Khanolkar.
Chartered Accountants.

G. D. Apte,
B. A., G. D. A., F. C. A., Chartered Accountant.

## इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील कंपनीला १९५६ मध्यें गेल्या वर्षातील शिलकी नफा (२,८३,१३६ रु.) धरून ८,८५,२८५ रु. नफा झाला. प्रत्येक भागास करमाफ ५ रु. डिव्हिडंड देण्यासाठी ५,००,००० रु. लागतील. ३,२३,८७४ रु. शिलकी नफा पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढला जाईल. कंपनीच्या इन्व्हेस्टमेंटची बाजारभावानें होणारी किंमत हिशेबांत दाखविलेल्या किंमतीपेक्षा २·१% अधिक होती. कंपनीचें वसूल भांडवल ९९,९९,२५० रु. आहे. (७५० रु. चे कॉल्स भरणा झालेले नाहींत) गंगाजळी व इतर रिझर्व्ह २३,३६,८५४ रु. चे आहेत. कंपनीच्या गुंतवणुकीची धंदेवार छाननी खाली दिली आहे. त्यावरून, ९७·६०% भांडवल औद्योगिक रोख्यांत असून फक्त २·४०% भांडवल सरकारी रोख्यांत आहे, हें दिसून येईल.

**ट्रस्टची धंदेवार गुंतवणूक**

| | | % |
|---|---|---|
| बँका | ... | ७·४२ |
| सिमेंट | ... | ३·९२ |
| केमिकल्स | ... | १·६० |
| कोळसा | ... | १·३२ |
| कपास, रेशीम | ... | १२·९१ |
| इलेक्ट्रिक, ट्रॅम्स | ... | ९·७६ |
| विमा | ... | २·२४ |
| लोखंड–पोलाद | ... | ५·०० |
| ताग | ... | ९·२९ |
| खाणी | ... | १·८६ |
| इतर | ... | २०·४२ |
| तेल | ... | ... |
| कागद | ... | २·१७ |
| रेल्वेज | ... | ... |
| रबर | ... | ०·५९ |
| मीठ | ... | १·४९ |
| शिपिंग | ... | ४·९३ |
| साखर | ... | ९·४६ |
| चहा | ... | ३·२० |
| टेलिफोन्स | ... | ०·०२ |
| सरकारी रोखे | ... | २·४० |
| | | १००·०० |

**रुपयांतील व स्टर्लिंगमधील गुंतवणूक**

| | | % |
|---|---|---|
| रुपयांतील रोखे | ... | ९४·९१ |
| स्टर्लिंगमधील रोखे | ... | ५·०९ |
| | | १००·०० |

**रोख्यांची छाननी**

| | | % |
|---|---|---|
| सरकारी रोखे व डिबेंचर्स | ... | ८·६१ |
| प्रेफरन्स शेअर्स | ... | १५·६२ |
| ऑर्डिनरी शेअर्स व स्टॉक | ... | ७५·७७ |
| | | १००·०० |

**मद्रासमधील गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन**

मद्रास राज्य सरकारनें मद्रासमधील गलिच्छ व घाणेरड्या वस्त्या नाहींशा करण्यासाठी त्वरित उपाय करण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मुख्यमंत्री श्री. कामराज, अर्थमंत्री श्री. सुब्रम्हण्यम् आणि मद्रास कॉर्पोरेशनचे अधिकारी ह्यांची बैठक भरविण्यांत आली होती. मद्रासमधील गलिच्छ व घाणेरड्या वस्त्यांचा प्रश्न बराच जुना आहे. शहरांत अशा प्रकारच्या आरोग्यविघातक ३११ वस्त्या आहेत. त्यामधून ५६,००० कुटुंबें म्हणजे सुमारें २·६ माणसें कशीबशी रहात आहेत. एकूण वस्त्यांपैकी २०६ खाजगी जमिनींवर आहेत. ५६ सरकारी जमिनीवर आहेत. ह्या वस्त्या उठविण्याच्या अगर सुधारण्याच्या अनेक योजनांचा विचार सरकारतर्फे करण्यांत येत आहे. त्यांची सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारनें २० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. सरकारची निरनिराळीं खातीं व कॉर्पोरेशन ह्यांनीं मिळून १५ दिवसांच्या आंत सूचना करावयाच्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें १९८ लाख रुपये देण्याची व्यवस्था केलेली आहे. पाणीपुरवठ्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. ग्रामीण भागांत विकासाचीं कामें जशीं करण्यांत येत आहेत, त्याच पद्धतीवर हें काम करण्यांत येईल. सर्व काम कॉर्पोरेशनच्या देखरेखीखाली होणार असून सरकारी जागेवरील वस्त्याहि कॉर्पोरेशनच नंतर आपल्या ताब्यांत घेईल.

**रेल्वेच्या चाकाची मागणी**—भारतामधील रुंद रुळांच्या रेल्वेवर चालणाऱ्या डब्यांसाठी ४,००० रेल्वेच्या चाकांच्या जोड्या पुरविण्याची मागणी एका पोलंडमधील कारखान्याकडे नोंदविण्यांत आली आहे. ह्या सामुग्रीची किंमत सुमारें ६० लाख रुपये होईल. कलकत्त्यामधील एक कंपनी ४,००० मालवाहू डबे तयार करणार आहे.

**जामनगरच्या व्यापाऱ्यांना नोटिसा**—जामनगर येथील २० व्यापाऱ्यांना १९४६ सालामधील प्राप्तीकर भरण्याच्या नोटिसा खात्यातर्फे देण्यांत आल्या आहेत. ह्या व्यापाऱ्यांकडे १ कोटी रुपये रक्कम येणें आहे. १९४६ सालीं सौराष्ट्रांत प्राप्तीकर बसलेला नव्हता. पण ह्या व्यापाऱ्यांनीं आपल्या मुंबईतील एजंटांतर्फे भरमसाठ नफा मिळविला असें खात्याचें म्हणणें आहे.

**भारतामधील कलाकृतींचें प्रदर्शन**—भारतामधील हस्तव्यवसायांत तयार करण्यांत आलेल्या विविध कलापूर्ण वस्तूंचें प्रदर्शन पॅरिसमध्यें उघडण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत लांकडावरील व हस्तीदंतावरील नक्षीकाम, रंगीबेरंगी साड्या, चांदीच्या वस्तु, इत्यादि प्रकारचे ४०० नमुने ठेवण्यांत आले होते.

**फ्रान्समधील हृदयविकार**—गेल्या वर्षी फ्रान्समध्यें जीं माणसें मृत्यू पावलीं, त्यांपैकी सर्वांत अधिक हृदयविकारानें मरण पावलीं. त्या खालोखाल कॅन्सरनें माणसांचा बळी घेतला. एकूण ५,३९,४०० मृत्यूंपैकी ९८,००० हृदयविकारानें व ७७,४०० कॅन्सरनें झाले.

**वापरलेल्या बसेसचा उपयोग**—सीलोनच्या सरकारनें रस्त्यावरील मोटारींची वहातूक आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. वहातुकीसाठी लंडन ट्रॅन्सपोर्ट बोर्डानें फक्त ४ वर्षे वापरलेल्या ६५ बसेस देऊं केल्या आहेत. ह्या बसेस खोलून पुन्हां व्यवस्थित जोडण्यांत आलेल्या असून आणखी २५ वर्षें तरी त्या काम देतील असा अंदाज आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.